महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# नागरिकांची सनद
# (सिटिझन चार्टर)
# २०२६



# प्रास्ताविक



*महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा अधिक पारदर्शक, वेळबद्ध व उत्तरदायी पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने* ***नागरिकांची सनद*** *सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकास ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून, ती वर्तमान व भावी पिढ्यांसाठीची सामूहिक बांधिलकी आहे.*

*महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक, नागरी व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणीय समतोल राखणे, प्रदूषणास प्रतिबंध करणे तसेच नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. या उद्देशाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जल, हवा तसेच विविध प्रकारच्या कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाचे प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी संबंधित कायदे व नियमांच्या तरतुदीनुसार कार्यरत आहे.*

*मंडळामार्फत उद्योग, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य सेवा आस्थापना तसेच इतर संबंधित घटकांना विविध अधिनियमांअंतर्गत संमतीपत्रे, प्राधिकारपत्रे व सेवा प्रदान करण्यात येतात. या सेवा निश्चित कालमर्यादेत, पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पुरविणे, तसेच नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण करणे, याबाबत मंडळ कटिबद्ध आहे. सदर नागरिकांच्या सनदीद्वारे सेवा वितरण प्रक्रिया अधिक स्पष्ट, सुलभ व उत्तरदायी करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.*

*पर्यावरण संरक्षणाच्या कार्यात शासनाच्या विविध यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, औद्योगिक क्षेत्र, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिक यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व संबंधित घटकांच्या सक्रिय सहभागातूनच स्वच्छ, सुरक्षित व पर्यावरणपूरक महाराष्ट्र साध्य करता येईल, असा मंडळाचा दृढ विश्वास आहे.*

*भविष्यातही राज्याचा विकास नैसर्गिक पर्यावरणाच्या हानीच्या मोबदल्यात होऊ नये, याची दक्षता घेत पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण व शाश्वत विकासाच्या दिशेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सातत्याने प्रयत्नशील राहील.*

*श्री. सिद्धेश रामदास कदम*
*अध्यक्ष*
*महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ*

# प्रस्तावना



शासनाच्या लोकाभिमुख, पारदर्शक व उत्तरदायी प्रशासन या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी नागरिकांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती सुलभ व सुबोध स्वरूपात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव होणे, तसेच सेवा पुरविताना प्रशासनाची जबाबदारी निश्चित होणे, या उद्देशाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत **नागरिकांची सनद** प्रकाशित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे जल, हवा तसेच विविध प्रकारच्या कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाचे प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी संबंधित कायदे व नियमांच्या तरतुदीनुसार कार्यरत आहे. मंडळामार्फत उद्योग, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य सेवा आस्थापना तसेच इतर संबंधित घटकांना विविध अधिनियमांअंतर्गत संमतीपत्रे, प्राधिकारपत्रे व सेवा प्रदान करण्यात येतात. सदर सेवा वेळेत, पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देणे, तसेच नागरिकांच्या तक्रारींचे विहित कालावधीत निवारण करणे, यासाठी मंडळ कटिबद्ध आहे.

सदर नागरिकांच्या सनदीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांचे स्वरूप, त्या सेवा देण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या कालमर्यादा, संबंधित पदनिर्देशित अधिकारी तसेच अपील व तक्रार निवारणाची कार्यपद्धती यांचा तपशीलवार समावेश करण्यात आलेला आहे. या सनदीमुळे सेवा वितरण प्रक्रियेत स्पष्टता व सुसंगतता येऊन, उत्तरदायित्व अधिक प्रभावीपणे निश्चित होईल आणि नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास दृढ होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

पर्यावरण संरक्षण व प्रदूषण नियंत्रण ही सामूहिक जबाबदारी असून, नागरिक, उद्योग व संस्था यांनी पर्यावरण विषयक कायदे व नियमांचे पालन करून मंडळाच्या कार्यास सहकार्य करावे, ही अपेक्षा आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे नागरिकांना कार्यक्षम, पारदर्शक व दर्जेदार सेवा देण्यासाठी तसेच पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहील.

श्री. एम. देवेंदर सिंह (भा.प्र.से.)
सदस्य सचिव
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# अनुक्रमणिका


नागरिकांची सनद ........................................................................................ १

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ............ २

प्रस्तावना: .............................................................................................. २

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ : ................................................................ २

जैविक वैद्यकीय कचरा : ............................................................................ ३

औद्योगिक प्रदूषण : .................................................................................. ४

घनकचरा : ............................................................................................... ४

घातक घनकचरा :....................................................................................... ५

इलेक्ट्रॉनिक कचरा :.................................................................................. ५

प्लास्टिक कचरा :....................................................................................... ५

बांधकाम आणि विघटनशील कचरा :............................................................... ६

उपाययोजना : ............................................................................................ ७

**परिशिष्ट** १ ............................................................................................ ९

परिशिष्ट एक (अ)........................................................................................ १७

परिशिष्ट एक (ब)........................................................................................ १८

परिशिष्ट एक (क) ....................................................................................... १९

परिशिष्ट दोन.............................................................................................. २०

परिशिष्ट तीन.............................................................................................. २१

परिशिष्ट चार.............................................................................................. २२

पर्यावरण कायद्यातील खालील कलमांनुसार कसुरदाराविरुद्ध करण्यात येणारी कायदेशीर कारवाई ......... २४

अ. जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व २०२४ च्या सुधारणेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास खालीलप्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार आहेत............................ २४

आ. हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ व २०२४ च्या सुधारणेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास खालीलप्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार आहेत............................ २५

इ. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ तसेच सुधारित अधिनियमांतर्गत असलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास.......................................................................................... २६

मुख्यालयातील विभागप्रमुख......................................................................................... २८

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयांची विभागनिहाय तपशीलवार माहिती. २९

# नागरिकांची सनद

# (सिटीझन चार्टर)

जनतेची कामे अधिक कार्यक्षमतेने व उत्तम प्रकारे पार पाडून शासनाच्या दैनंदिन कामात पारदर्शकता आणणे या शासनाच्या धोरणास अनुसरून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने नागरिकांची सनद या उपक्रमाद्वारे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या योजना व त्यांची अंमलबजावणी बाबतची माहिती त्याचप्रमाणे, विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरणाचा समतोल व प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण याबाबत केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती जनतेसमोर मांडण्याचा संकल्प केला आहे.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची सनद या पूर्वीच गठीत समितीची मान्यता घेऊन सन-२००० साली प्रसिद्ध करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०६.०९.२०११ च्या परिपत्रकानुसार नागरिकांची सनद प्रसिद्ध करून बराच कालावधी होऊन गेल्याने नागरिकांच्या सनदेत नव्याने काही योजना, शासन निर्णय व राज्य शासनाने पारित केलेले नियम / अधिनियम, इत्यादी सारांश स्वरुपात समाविष्ट करण्यात आले आहेत. विभागातील अधिकारी वर्गाची नांवे, पदनाम व दूरध्वनी क्रमांक तसेच माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीकरिता सहायक माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा तपशील त्याचप्रमाणे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वेबसाईटचाही नागरिकांच्या सनदेत समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील औद्योगिक दृष्टीने पुढारलेले राज्य असून, राज्यातील बहुतेक नागरी वस्ती बृहन्मुंबई प्राधिकरण व दहा-अ वर्ग शहरामध्ये एकवटली आहे. वाढत्या कारखान्यांमुळे व शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून परिणामी प्रदूषणामुळे मानवी जिवितास हानिकारक असलेले म्हणजे पटकी, विषमज्वर, कावीळ, दमा, श्वसनाचे रोग, मानसिक रोग, इत्यादी आजारांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. एवढेच नव्हे तर प्रदूषणामुळे शहरातील जलचर, वनचर, पशुपक्षी व वनस्पती यांनाही हानी पोहचत आहे. याकरिता पर्यावरणाचा समतोल राखून प्रदूषण प्रतिबंध करून नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आहे.

********************

# पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या
# अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
# Maharashtra Pollution Control Board

## प्रस्तावना:

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ :

महाराष्ट्र जल प्रदूषण अधिनियम, १९६९ अन्वये महाराष्ट्र जल प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना १९७० साली झाली. या अधिनियमाऐवजी महाराष्ट्रात १ जून १९८१ पासून केंद्रीय जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ स्वीकारला गेला. त्यामुळे या मंडळास अधिक अधिकार प्राप्त झाले. १९७४ चा अधिनियम स्वीकारल्यानंतर या मंडळाचे जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण मंडळ हे नाव बदलून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ असे ठेवण्यात आले. त्यानंतर १६ मे, १९८१ पासून हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ लागू करण्यात आला.

मंडळाची कार्ये:

१) विविध जलस्रोतांच्या व हवेच्या प्रदूषण नियंत्रणाखाली राज्यव्यापी योजना तयार करून त्याची अंमल बजावणी करणे.

२) जल प्रदूषण व हवा प्रदूषण प्रतिबंध नियंत्रणाबाबत राज्य शासनास सल्ला देणे.

३) जल प्रदूषण व हवा प्रदूषणासंबंधी, तसेच नियंत्रण कार्यवाही बद्दल माहिती संकलित करून प्रकाशित करणे.

४) जल प्रदूषण व हवा प्रदूषणासंबंधी समस्यांवरील संशोधनास प्रोत्साहन देणे, संशोधन करणे व त्यामध्ये सहभाग घेणे.

५) प्रदूषण नियंत्रणाखाली प्रशिक्षणाचे आयोजन करणे व संबंधित लोकशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करणे.

६) नागरी सांडपाणी, औद्योगिक सांडपाणी, त्याचप्रमाणे सांडपाणी प्रक्रिया संयंत्राच्या कार्याचे अधिनियमातील तरतुदीनुसार संमतीपत्र संदर्भात परिक्षण करणे, हवा प्रदूषण नियंत्रणाखाली असलेले उपकरण, यंत्रणा औद्योगिक सयंत्रणा, उत्पादन यांचे परिक्षण करणे व आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपाय योजनेसाठी निर्देशित करणे.

७) हवा प्रदूषण नियंत्रण क्षेत्रातील हवेचे मूल्यमापन करणे व प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.

८) सांडपाण्यातील व हवेतील प्रदूषण घटकांची मानके निश्चित करणे व त्यामध्ये सुधारणा करणे, त्याचप्रमाणे प्रदूषण घटक मिसळणाऱ्या जलस्रोतांची वर्गवारी करून त्याची मानके निश्चित करणे. विविध औद्योगिक संयंत्रातील उत्सर्जनानुसार हवा प्रदूषण घटकांची मानके इच्छित करणे.

९) एका विशिष्ट प्रकारच्या उद्योगामुळे/प्रकल्पामुळे ठराविक ठिकाणची हवा प्रदूषित होणार असेल किंवा जल प्रदूषित होणार असेल तर त्याबाबत राज्य शासनास योग्य तो सल्ला देणे.

१०) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व राज्य शासनाने वेळोवेळी नेमून दिलेली कार्ये पार पाडणे.

**जैविक वैद्यकीय कचरा** :

रूग्णालये, पॅालॅाजिकल लॅबोरेटरी, रासायनिक प्रयोगशाळा इत्यादी मधून निघणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया करणे पर्यावरणदृष्ट्या आवश्यक असते. याबाबत पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत केंद्र शासनाने बायोमेडीकल वेस्ट अधिसूचना दिनांक २० जुलै, १९९८ रोजी जारी केली होती. आता, केंद्र शासनाने दिनांक २८ मार्च, २०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ जारी केले आहेत. जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील नियम ११ (१) नुसार प्रधान सचिव (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समिती दि. १३/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारेस्थापन करण्यात आली आहे. शासकिय अधिसूचना दि.०७/०३/२०२२ प्रमाणे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती व जिल्हा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनासाठी गठीत करण्यात आलेली आहे.

म.प्र.नि. मंडळाकडून जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापना करिता जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची सभासद नोंदणी व बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी, तसेच रुग्णालयातून निर्माण होणाऱ्या सांडपाणी आणि/अथवा हवा प्रदूषण करणाऱ्या यंत्रणा इ. करिता जल प्रदूषण (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण), कायदा, १९७४, हवा प्रदूषण (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण), कायदा, १९८१ अंतर्गत अनुक्रमे जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र (ऑवोरायझेशन) आणि संमतीपत्र (कन्सेंट) घेणे व वैध असणे बंधनकारक आहे. संमतीपत्र (कन्सेंट) आणि प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन) न घेणाऱ्या वैद्यकीय आस्थापनांविरुद्ध (Hospitals) म.प्र.नि. मंडळाकडून दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येते.

संपूर्ण महाराष्ट्रात जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट हि ३४ सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रामार्फत लावली जाते. ज्या मध्ये उच्च तापमानावर कचऱ्याचे भस्मीकरण, प्लास्टिक कचऱ्याचे निर्जंतुकीकरण करून त्याचे लहान तुकडे करून प्लास्टिक उत्पादना (मॅन्युफॅक्चरिंग) साठी देणे या प्रक्रियनाचा समावेश होतो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयाकडून तसेच प्रादेशिक कार्यालयांकडून जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ बाबत अंमलबजावणीकरीता वैद्यकिय व्यवसायाशी निगडीत विविध संस्था तसेच जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकत्सक, पालिका आयुक्त इत्यादींकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येतो.

जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, १९९८ मधील नियम क्रमांक ८(३) नुसार पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक १० एप्रिल, २००३ च्या शासन निर्णयान्वये जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, १९९८ च्या अंतर्गत प्राधिकारपत्र (BMW Authorization) सुधारित शुल्क आकारण्यात येत होते, सदरील शुल्क हे दि. १०/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाने रद्द करण्यात आले आहे. सर्व वैद्यकीय आस्थापनांना दि. २१/०८/२०२४ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार अथवा त्यामध्ये वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सुधारणेनुसार आवश्यक संमतीपत्र शुल्क अदा करून सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा

व्यवस्थापन प्राधिकारपत्र (Combined Consent and BMWM Authorization) घेणे अनिवार्य राहील. सदरील संमतीपत्र शुल्क भांडवली गुंतवणुकीच्या ऐवजी रुग्णशय्याच्या संख्येवर आधारित केलेले असून राज्य आणि केंद्रीय सरकारी आरोग्य सेवा आस्थापनांसाठी दिनांक २१/०८/२०२४ पासून संमतीपत्रशुल्क हे नि:शुल्क करण्यात आलेले आहे.

**औद्योगिक प्रदूषण** :

शहरीकरणामुळे आणि चांगल्या राहणीमानाच्या इच्छेमुळे शहरांमध्ये लहान-मोठ्या कंपन्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. ही क्षेत्रे मोठ्या प्रमाणावर उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करतात आणि बाजार अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण आहेत. तथापि, अनेक लघु-उद्योगांना त्यांची अनियोजित वाढ, प्रवेशयोग्य उपचार उपकरणांचा अभाव आणि विविध प्रकारच्या व्यापार पद्धतींमुळे पर्यावरणाचे पालन करणे कठीण झाले आहे. या मर्यादांमुळेच सनियंत्रित सांडपाणी प्रक्रिया केंद्राची कल्पना उदयास आली. सनियंत्रित सांडपाणी प्रक्रिया केंद्र उद्योगांच्या विविध उद्योगांद्वारे निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सामूहिक उपाय प्रदान करतात.

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने १९८९ मध्ये अधिसूचना जारी केल्या ज्यात विशिष्ट उद्योगांच्या कार्यास प्रतिबंधित किंवा मर्यादित केले गेले. या उद्योगांच्या स्थानाबाबत निर्णय घेणे सोपे करण्यासाठी अधिसूचनांमध्ये उद्योगांचे ‘लाल’, ‘केशरी’, ‘हिरवे’ व ‘पांढरे’ असे वर्गीकरण करण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. त्यानंतर या संकल्पनेचा वापर केवळ उद्योग शोधण्याच्या उद्दिष्टासाठीच नाही तर उद्योगांचे निरीक्षण आणि तपासणीशी संबंधित मानके विकसित करणे आणि संमती व्यवस्थापित करण्याच्या उद्देशाने देखील विस्तारित करण्यात आला. उद्योगांचा आकार आणि संसाधनांचा वापर हे आतापर्यंतच्या प्रक्रियेचे वर्गीकरण करण्याचे मुख्य घटक आहेत. मुख्य निकषाने उत्सर्जन आणि सांडपाणी विसर्गामुळे होणारे प्रदूषण विचारात घेतले नाही किंवा आरोग्यावर होणारा संभाव्य परिणाम विचारात घेतलेला नाही.

**घनकचरा** :

नगरपालिका घनकचरा घनकचरा व्यवस्थापनामध्ये समाजातील घरे, व्यवसाय आणि संस्थांद्वारे तयार होणारा रोजचा कचरा संकलन, वाहतूक, विल्हेवाट आणि पुनर्वापराचा समावेश होतो. त्यात कागद, प्लास्टिक, सेंद्रिय पदार्थ आणि पुनर्वापर न करता येणारे साहित्य यांसारख्या विविध प्रकारच्या कचऱ्याचा समावेश होतो. पर्यावरणीय प्रदूषण रोखण्यासाठी, संसाधनांचे जतन करण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्यावरील परिणाम कमी करण्यासाठी प्रभावी कचरा व्यवस्थापन महत्त्वपूर्ण आहे. धोरणांमध्ये स्त्रोत वेगळे करणे, पुनर्वापर कार्यक्रम, कचरा ते ऊर्जा उपक्रम आणि जबाबदार लँडफिल पद्धती यांचा समावेश होतो. शाश्वत नगरपालिका घनकचरा घनकचरा व्यवस्थापन केवळ कचऱ्याच्या विल्हेवाट लावण्याच्या तात्काळ आव्हानाला तोंड देत नाही तर पर्यावरणास अधिक अनुकूल आणि संवेदनक्षम समुदाय तयार करण्यासाठी, पुनर्वापर आणि कमी वापराला प्रोत्साहन देऊन परिपत्र अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देते.

घनकचरा कचरा व्यवस्थापन नियम, २०१६, हे पर्यावरण आणि वन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या ८ एप्रिल, २०१६ रोजी प्रकाशित अधिसूचनेनुसार लागू झाले; यामुळे नगरपालिका घनकचरा नियम (व्यवस्थापन आणि हाताळणी), २००० रद्द करण्यात आले.

**घातक घनकचरा** :

महाराष्ट्र राज्यात एकूण चार सामान्य घातक कचरा प्रक्रिया, साठवणूक आणि विल्हेवाट सुविधा स्थापित आणि यशस्वीरित्या कार्यरत आहेत. मुंबई कचरा व्यवस्थापन (एमडब्लुएम), तळोजा आणि ट्रान्स ठाणे कचरा व्यवस्थापन संघटना (टीटीसीडब्लुएमए), महापे या दोन सुविधा नवी मुंबई विभागांतर्गत आहेत. महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लिमिटेड (एमइपीएल), रांजणगाव हे पुणे विभागांतर्गत आहे आणि महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लिमिटेड (एमइपीएल), बुटीबोरी औद्योगिक क्षेत्र नागपूर विभागांतर्गत आहे.

**इलेक्ट्रॉनिक कचरा** :

इलेक्ट्रॉनिक कचरा किंवा ई-कचरा टाकून दिलेल्या इलेक्ट्रिकल किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे वर्णन करतो. त्यामध्ये टाकून दिलेली इलेक्ट्रॉनिक साधने आणि उपकरणे जसे की संगणक, स्मार्टफोन, दूरदर्शन आणि विविध गॅझेट समाविष्ट आहेत. तंत्रज्ञानाच्या जलद उत्क्रांतीमुळे ई-कचरा निर्मितीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. वापरलेले इलेक्ट्रॉनिक जे पुनर्वापर, पुनर्विक्री, तारण, पुनर्वापर किंवा विल्हेवाट लावण्यासाठी नियत आहेत ते देखील ई-कचरा मानले जातात. विकसनशील देशांमध्ये ई-कचऱ्याच्या अनौपचारिक प्रक्रियेमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात आणि पर्यावरण प्रदूषण होऊ शकते. इलेक्ट्रॉनिक कचरा घटक, जसे की सीपीयुमध्ये, शिसे, कॅडमियम, बेरिलियम किंवा ब्रोमिनेटेड ज्वाला प्रतिरोधक हयासारखे संभाव्य हानिकारक घटक असतात. ई-कचऱ्याच्या पर्यावरणीय प्रभावाबाबत ग्राहकांची जागरूकता वाढवणे, जबाबदारीने विल्हेवाट लावण्याच्या पद्धतींवर भर देणे आणि जुन्या इलेक्ट्रॉनिक्सच्या पुनर्वापराला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ई-कचऱ्यामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी नियामक उपाय, तांत्रिक प्रगती आणि ग्राहकांच्या वर्तनात बदल करून शाश्वत पद्धती वाढवणे आणि परिपत्र अर्थव्यवस्थेची तत्त्वे आत्मसात करणे या सर्वसमावेशक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

**प्लास्टिक कचरा** :

पर्यावरण आणि वन मंत्रालयाने नवी दिल्ली यांनी ४ फेब्रुवारी, २०११ रोजी प्रकाशित केलेल्या अधिसूचनेनुसार प्लास्टिक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, २०११ लागू झाला; १८ मार्च, २०१६ रोजी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अधिसूचित करण्यात आला आहे, ज्यामध्ये २७ मार्च, २०१८, १२ ऑगस्ट, २०२१, १७ सप्टेंबर, २०२१, १६ फेब्रुवारी, २०२२ आणि ६ जुलै, २०२२ रोजी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या नियम १६ मध्ये प्रत्येक राज्यात प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक आहे. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने ४ जानेवारी, २०१७ रोजी शासन निर्णय प्लास्टिक २०१३/(२८४/२०१३) द्वारे प्रधान

सचिव, नगर विकास विभाग-II, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समिती स्थापन केली आहे.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ आणि त्यात सुधारणा अंतर्गत, वार्षिक प्लास्टिक कचरा पुनर्वापर करणारे १४.०२ लाख टन क्षमतेचे २९० प्लास्टिक कचरा पुनर्वापर करणारे आणि २५ जैवविघटनशील आणि खतात रूपांतर होणारे पदार्थ उत्पादक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नोंदणीकृत आहेत. नोंदणीकृत प्लास्टिक कचरा पुनर्वापर आणि खत सामग्री उत्पादकांची यादी महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळाच्या संकेतस्थळावर नियमितपणे प्रकाशित आणि अदययावत केली जाते.

महाराष्ट्र शासनाने २३ मार्च, २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल उत्पादने (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवण) अधिसूचना,२०१८ प्रकाशित केली आहे, व त्यामध्ये दिनांक ११ एप्रिल २०१८, ३० जून २०१८, १४ जून २०१९, २८ मार्च २०२२, १५ जुलै २०२२, २७ जुलै २०२२ आणि ३० नोव्हेंबर २०२२ रोजी सुधारणा करण्यात आलेली आहे.

ही अधिसूचना संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू आहे. या अधिसूचनेच्या तरतुदीनुसार दोन समित्या स्थापन केल्या आहेत.
प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल अधिसूचनेच्या बाबतीत शासनाला तांत्रिक मार्गदर्शनासाठी तज्ञ समिती

माननीय मंत्री (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली अधिकार प्राप्त समिती आवश्यक सुधारणा ठरवणे आणि उक्त अधिसूचनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेईल. आतापर्यंत तज्ज्ञ समिती आणि अधिकार प्राप्त समितीच्या अनेक बैठका झाल्या असून त्यानंतर अधिसूचनेमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक संस्था प्राधिकरणे आणि म. प्र. नि. मंडळातील अधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील आणि म. प्र. नि. मंडळातील अधिकाऱ्यांकडून उद्योगांसाठी स्वतंत्रपणे नियमित सर्वेक्षण केले गेले आहे.

**बांधकाम आणि विघटनशील कचरा** :

बांधकाम आणि विघटनशील कचरा म्हणजे इमारती, नूतनीकरण आणि बांधकामे पाडणे, जसे की निवासी आणि व्यावसायिक इमारती, रस्ते आणि पूल यांच्यापासून निर्माण होणारी सामग्री. कचऱ्याच्या या श्रेणीमध्ये काँक्रीट, लाकूड, धातु, विटा, काच आणि इतर बांधकाम साहित्य यासारख्या विविध प्रकारच्या सामग्रीचा समावेश होतो. बांधकाम उद्योग हा बांधकाम आणि विघटनशील कचऱ्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारा आहे आणि शहरी विकासाच्या वाढत्या गतीमुळे टाकून दिलेल्या सामग्रीचे प्रमाण वाढते. बांधकाम आणि विघटनशील कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन अनेक कारणांसाठी महत्त्वाचे आहे. बांधकाम कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट पर्यावरणाला हानी पोहोचवते, विशेषत: काँक्रीट आणि लाकूड यासारखे संथ-विघटन करणारे घटक. पुनर्वापर आणि जबाबदार व्यवस्थापन केवळ संसाधनांचे संरक्षण करत नाही तर नवीन कच्चा माल काढण्यासाठी आणि त्यावर प्रक्रिया

करण्याशी संबंधित पर्यावरणीय प्रभाव कमी करते. शाश्वत बांधकाम आणि विघटनशील कचरा व्यवस्थापनासाठी स्त्रोत वेगळे करणे, पुनर्वापर करणे आणि प्रगत कचरा प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर यासारख्या धोरणांची अंमल बजावणी करणे आवश्यक आहे. शिवाय, बांधकाम उद्योगात बांधकाम आणि विघटनशील कचरा कमी करणे, त्याचा पुनर्वापर आणि पुनर्वापर करण्याच्या फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि इमारत आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अधिक टिकाऊ दृष्टीकोन वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. शेवटी, बांधकाम क्षेत्राच्या पर्यावरणीय पाऊलखुणा कमी करण्यासाठी बांधकाम आणि विघटनशील कचरा व्यवस्थापनासाठी सर्वांगीण आणि पर्यावरणाच्या दृष्टीने जागरूक दृष्टीकोन आवश्यक आहे.

**उपाययोजना :**

## पर्यावरण संरक्षण व प्रदूषण नियंत्रण

१) जल प्रदूषणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन नद्यांच्या खोऱ्याचे प्रदेश जल प्रदूषण प्रतिबंध क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यात आले. या क्षेत्रातील सांडपाण्याचे नि:स्सारण करण्यासाठी प्रदूषक अभिकरणास मंडळाचे संमतीपत्र घ्यावे लागते. संमतीपत्राबाबतची प्रक्रिया व अटींची माहिती परिशिष्ट एक, एक (अ), (ब) व (क) मध्ये जोडली आहे.

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल कायद्याअंतर्गत संमतीपत्र नामंजूर केल्यास अपील / पुनर्निरीक्षण अपील करण्याबाबत व त्यावरील निर्णय देण्याबाबत लागणारा कालावधी परिशिष्ट दोन मध्ये नमूद केला आहे.

३) प्रदूषण विषयक तक्रारी : प्रदूषणाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यावर विहित कालावधीत करावयाची कार्यपद्धती परिशिष्ट तीन मध्ये नमूद केलेली आहे.

४) सांडपाण्यातील विविध प्रदूषण घटकांमुळे प्रदूषणाची निर्मिती होते. सर्व उद्योगांना, ज्याचे उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी योग्य ती यंत्रणा उभारणे व ती चालविणे बंधनकारक आहे. लघुउद्योग स्वत:ची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविणे आर्थिकदृष्ट्या सोईस्कर नसते म्हणून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया योजना सुरू करण्यात आली आहे.

५) नद्यांचे प्रदूषण शहरी सांडपाण्यामुळे होत असल्यामुळे नद्यांचे काठावरील शहरांच्या सांडपाण्याची शुद्धिकरणानंतर योग्य प्रकारे प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जाते. त्याप्रमाणे नदी घाट विकास, स्मशानभूमि, स्वच्छता गृहाचे बांधकाम व नदी काठी वनीकरण, सुशोभिकरण काम करणे इत्यादी कामे महानगरपालिका, नगर परिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करणे बंधनकारक आहे.

६) सरोवरांचे संरक्षण व संवर्धन या योजनेखाली सरोवराचे प्रदूषण रोखणे, पाणलोट क्षेत्रात प्रक्रियेची कामे हाती घेणे, सरोवरातील गाळ काढणे व सरोवरातील वन्यजीव यांचे संरक्षण व विकास कामे हाती घेतली जातात.

७) हवा प्रदूषण नियंत्रण - एखादा प्रदेश हवा प्रदूषण नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित झाल्यानंतर त्या प्रदेशातील उद्योगांना आपला कारखाना सुरु करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून हवा प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुमती मिळवावी लागते. अनुमती देण्यापूर्वी अशा उद्योजकांकडून हवा प्रदूषणाची चाचणी

करणे, त्यातील प्रक्रिया यंत्रणेत वापरण्यात येणारा कच्चा माल, हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची आवश्यकता, हवा प्रदूषण नियंत्रणाची उत्तम पद्धत याचा अभ्यास करून व उत्सर्जित वायूचे नमुने तपासून अटींची पूर्तता झाल्यानंतर संमती पत्र देण्यात येते.

८) धुरांड्यातू होणाऱ्या उस्तर्जनाची तसेच वाहनातून होणाऱ्या उत्सर्जनाची रासायनिक तपासणी करण्यासाठी आवश्यक उपकरणांसहित प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

९) घातक कचरा व्यवस्थापन :- रसायने व जंतुनाशक बनविणाऱ्या कारखान्यातून निघणाऱ्या विषारी घटकांचे प्रमाण अधिक असते. हे प्रदुषणकारक घटक पाण्यामध्ये लवकर विरघळू शकतात. अशा प्रकारचे प्रदूषण पाणी पाझरून, विहिरींचे किंवा नदीचे पाणी प्रदूषित होण्याची शक्यता असते. म्हणून घातकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी काळजीपूर्वक जागा निवडण्यात येते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास या कामासाठी नियुक्त केले आहे.

१०) टाकाऊ रासायनिक पदार्थ जाळून टाकण्यासाठी काही कारखान्याची स्वत:ची भस्मीकरण संयंत्रे उभारली आहेत. उद्योजकांना परवान्याचे नूतनीकरण करण्यापूर्वी घातक पदार्थांच्या समाधानकारक प्रक्रिया व विल्हेवाटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

११) रुग्णालय, पॅथॉलॉजिकल लॅब रासायनिक प्रयोगशाळा इत्यादि मधून निघणारा जैव वैद्यकीय कचरा

१२) प्रदूषित असतो. त्यामुळे जैव वैद्यकीय कचऱ्यावर शात्रोक्तरित्या प्रक्रिया त्याची विल्हेवाट लावण्यात येणे आवश्यक आहे. हि जबाबदारी संबंधित रुग्णालये, कत्तलखाने व प्रयोगशाळा या संस्थांची आहे.

१३) घातक द्रव गळतीच्या वेळी कोणती काळजी घ्यावी याबाबतची माहिती परिशिष्ट पाच मध्ये दिलेली आहे.

# परिशिष्ट १

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ अन्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवा.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th colspan="2">लोकसेवांचा तपशील</th><th>प्रचलित नियमांच्या तरतुदींनुसार लोकसेवा देण्यासाठी निर्धारित केलेली कालमर्यादा</th><th>पदनिर्देशित अधिकारी</th><th>प्रथम अपिलीय अधिकारी</th><th>दुसरे अपिलीय अधिकारी</th></tr>
<tr><td rowspan="3">१.</td><td colspan="6">जल (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९७४ आणि हवा (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९८१ अन्वये उद्योग स्थापनेसाठी/ कार्यान्वयासाठी/ नूतनीकरणासाठी संमती आणि घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सीमापार वाहतूक) नियम, २०१६ अन्वये प्राधिकारपत्र.</td></tr>
<tr><td>(क)</td><td>उद्योग स्थापनेसाठी/ कार्यान्वयासाठी/ नूतनीकरणासाठी/ सुधारणेसाठी संमती : १०० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणूक असणारी हरित प्रवर्गातील उद्योग</td><td rowspan="2">
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>अर्ज</th><th colspan="3">कालावधी (दिवसांमध्ये)</th></tr>
<tr><td></td><td>संमती देणे किंवा नाकारणे</td><td>लाल प्रवर्ग</td><td>नारंगी प्रवर्ग</td><td>हरित प्रवर्ग</td></tr>
<tr><td>१</td><td>स्थापन करण्यासाठी संमती</td><td>६०</td><td>४५</td><td>३०</td></tr>
<tr><td>२</td><td>पहिल्या वेळी कार्यान्वयासाठी संमती</td><td>९०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
<tr><td>३</td><td>संमती पत्राचे नूतनीकरण किंवा विस्तार किंवा सुधारणा करण्यासाठी</td><td>१२०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
</table>
</td><td>उप प्रादेशिक अधिकारी</td><td>प्रादेशिक अधिकारी</td><td>विभाग प्रमुख</td></tr>
<tr><td>(ख)</td><td>उद्योग स्थापनेसाठी/ कार्यान्वयासाठी/ नूतनीकरणासाठी/ सुधारणेसाठी संमती<br><br>१० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारा (परिशिष्ट – अ मध्ये सूचीबद्ध केलेले उद्योग</td><td>प्रादेशिक अधिकारी</td><td>विभाग प्रमुख</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>वगळून) लाल प्रवर्गातील उद्योग<br><br>१५० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारा नारंगी प्रवर्गातील उद्योग<br><br>१०० कोटी रुपयांपेक्षा अधिक ते ५०० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारा हरित प्रवर्गातील उद्योग<br><br>२५ कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारे पायाभूत सुविधा प्रकल्प.</td>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>(ग)</td>
<td>उद्योग स्थापनेसाठी/ कार्यान्वयासाठी/ नूतनीकरणासाठी/ सुधारणेसाठी संमती<br><br>१० कोटी रुपयांपेक्षा अधिक ते ५० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारा</td>
<td>
<table>
<tr><td>अ.क्र</td><td>अर्ज</td><td colspan="3">कालावधी (दिवसांमध्ये)</td></tr>
<tr><td></td><td>संमती देणे किंवा नाकारणे</td><td>लाल प्रवर्ग</td><td>नारंगी प्रवर्ग</td><td>हरित प्रवर्ग</td></tr>
<tr><td>१</td><td>स्थापन करण्यासाठी संमती</td><td>६०</td><td>४५</td><td>३०</td></tr>
<tr><td>२</td><td>पहिल्या वेळी कार्यान्वया</td><td>९०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
</table>
</td>
<td>विभाग प्रमुख</td>
<td>सदस्य सचिव</td>
<td>अध्यक्ष</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>लाल प्रवर्गातील उद्योग<br><br>१५० कोटी रुपयांपेक्षा अधिक ते ५०० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारा नारंगी प्रवर्गातील उद्योग<br><br>५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक ते १००० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारा हरित प्रवर्गातील उद्योग<br><br>२५ कोटी रुपयांपेक्षा अधिक ते १०० कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणुक असणारा पायाभूत सुविधा प्रकल्प.</td>
<td><table>
<tr><td></td><td>साठी संमती</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>संमती पत्राचे नूतनीकरण किंवा विस्तार किंवा सुधारणा करण्यासाठी</td><td>१२०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
</table></td>
<td></td>
<td></td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>(घ)</td>
<td>उद्योग स्थापनेसाठी/ कार्यान्वयासाठी/ नूतनीकरणासाठी/ सुधारणेसाठी संमती<br>५० कोटी रुपयांपेक्षा अधिक ते १५० कोटी रुपयांपर्यंत</td>
<td><table>
<tr><td>अ. क्र</td><td>अर्ज</td><td colspan="3">कालावधी (दिवसांमध्ये)</td></tr>
<tr><td></td><td>संमती देणे किंवा नाकारणे</td><td>लाल प्रवर्ग</td><td>नारंगी प्रवर्ग</td><td>हरित प्रवर्ग</td></tr>
</table></td>
<td>संमतीपत्र समिति</td>
<td>अध्यक्ष</td>
<td>प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>भांडवली<br>गुंतवणुक असणारा<br>लाल प्रवर्गातील<br>उद्योग<br>५०० कोटी<br>रुपयांपेक्षा अधिक<br>ते १५०० कोटी<br>रुपयांपर्यंत<br>भांडवली<br>गुंतवणुक असणारा<br>नारंगी प्रवर्गातील<br>उद्योग<br>१००० कोटी<br>रुपयांपेक्षा अधिक<br>ते ४००० कोटी<br>रुपयांपर्यंत<br>भांडवली<br>गुंतवणुक असणारा<br>हरित प्रवर्गातील<br>उद्योग<br><br>१०० कोटी<br>रुपयांपेक्षा अधिक<br>ते ७५० कोटी<br>रुपयांपर्यंत<br>भांडवली<br>गुंतवणुक असणारा<br>पायाभूत सुविधा<br>प्रकल्प.</td>
<td><table>
<tr><td>१</td><td>स्थापन करण्यासाठी संमती</td><td>६०</td><td>४५</td><td>३०</td></tr>
<tr><td>२</td><td>पहिल्या वेळी कार्यान्वयासाठी संमती</td><td>९०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
<tr><td>३</td><td>संमती पत्राचे नूतनीकरण किंवा विस्तार किंवा सुधारणा करण्यासाठी</td><td>१२०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
</table></td>
<td></td>
<td></td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>(ड)</td>
<td>उद्योग<br>स्थापनेसाठी/<br>कार्यान्वयासाठी/<br>नूतनीकरणासाठी/<br>सुधारणेसाठी<br>संमती<br>१५० कोटी<br>रुपयांपेक्षा अधिक<br>भांडवली<br>गुंतवणुक असणारा</td>
<td><table>
<tr><td>अ. क्र</td><td>अर्ज</td><td colspan="3">कालावधी (दिवसांमध्ये)</td></tr>
<tr><td></td><td>संमती देणे किंवा नाकारणे</td><td>लाल प्रवर्ग</td><td>नारंगी प्रवर्ग</td><td>हरित प्रवर्ग</td></tr>
</table></td>
<td>संमतीपत्र मुल्यांकन समिती</td>
<td>प्रधान सचिव, पर्यावरणव वातावरणीय बदल विभाग</td>
<td>--</td>
</tr>
</table>

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाल प्रवर्गातील उद्योग<br><br>१५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक भांडवली गुंतवणुक असणारा नारंगी प्रवर्गातील उद्योग<br><br>४००० कोटी रुपयांपेक्षा अधिक भांडवली गुंतवणुक असणारा हरित प्रवर्गातील उद्योग<br><br>७५० कोटी रुपयांपेक्षा अधिक भांडवली गुंतवणुक असणारा पायाभूत सुविधा प्रकल्प. | १ | स्थापन करण्यासाठी संमती | ६० | ४५ | ३० | | | |
| | | | २ | पहिल्या वेळी कार्यान्वयासाठी संमती | ९० | ६० | ३० | | | |
| | | | ३ | संमती पत्राचे नूतनीकरण किंवा विस्तार किंवा सुधारणा करण्यासाठी | १२० | ६० | ३० | | | |
| २ | घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सीमापार वाहतूक) नियम, २०१६ अन्वये प्राधिकारपत्र व त्यातील सुधारणा | | | | | | | | | |
| | (क) | घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सीमापार वाहतूक) नियम, २०१६ आणि त्यातील सुधारणान्वये घातक कचऱ्याची प्रक्रिया, पुन:वापर व पुन:प्राप्ती करण्यासाठी प्राधिकारपत्र | १२० दिवस | | | | | विभाग प्रमुख | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| | (ख) | घातक व इतर कचरा | | | | | | विभाग प्रमुख | सदस्य सचिव | अध्यक्ष |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | (व्यवस्थापन व सीमापार वाहतूक) नियम, २०१६ च्या आणि त्यातील सुधारणा याच्या भाग – घ च्या अनुसूची – ३ नुसार आणि त्यातील सुधारणान्वये घातक कचरा आयात करण्यासाठी एकवेळचे प्राधिकारपत्र | | | | |
| | (ग) | घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सीमापार वाहतूक) नियम, २०१६ आणि त्यातील सुधारणा याच्या नियम १८ अन्वये महाराष्ट्र राज्यात वाहनाद्वारे घातक कचरा वाहतूक करण्यासाठी वाहतूकदारांना प्राधिकारपत्र | | विभाग प्रमुख | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| ३ | घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अन्वये प्राधिकारपत्र | | | | | |
| | (क) | ‘ क ‘ वर्ग नगरपरिषदा - | ६० दिवस | उप प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | विभाग प्रमुख |
| | (ख) | ‘ ब ‘ वर्ग नगरपरिषदा - आणि कटकमंडळे | | प्रादेशिक अधिकारी | विभाग प्रमुख | सदस्य सचिव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (ग) | ‘ अ ‘ वर्ग नगरपरिषद | | विभाग प्रमुख | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| | (घ) | सर्व महानगरपालिका | | संमतीपत्र समिती | अध्यक्ष | प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग |
| ४ | बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अन्वये प्राधिकारपत्र | | | | | |
| | (क) | ‘ क ‘ वर्ग नगरपरिषदा - | बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार कोणतीही कालमर्यादा विहित केलेली नाही, तथापी, मंडळाने १२० दिवसांचा कालावधी निर्धारित केला आहे. | उप प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | विभाग प्रमुख |
| | (ख) | ‘ ब ‘ वर्ग नगरपरिषदा - आणि कटकमंडळे | | प्रादेशिक अधिकारी | विभाग प्रमुख | सदस्य सचिव |
| | (ग) | ‘ अ ‘ वर्ग नगरपरिषद | | विभाग प्रमुख | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| | (घ) | सर्व महानगरपालिका | | संमतीपत्र समिती | अध्यक्ष | प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग |
| ५ | जल (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९४७ आणि हवा (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९८१ आणि सुधारणा केल्याप्रमाणे जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ आणि घातक कचरा व्यवस्थापन व सीमापार वाहतूक नियम, २०१६ यांच्या तरतूदीन्वये आरोग्य सेवा आस्थापनांसाठी संयुक्त संमतीपत्र आणि जैव वैद्यकीय कचरा प्राधिकारपत्र. | | | | | |
| | (क) | १ – २५ खाटा | अ. | अर्ज | कालावधी (दिवसांमध्ये) | उप प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | विभाग प्रमुख |

<table>
<tr><td rowspan="4"></td><td>(ख)</td><td>२६ – ५० खाटा</td><td rowspan="4">
<table>
<tr><td>क्र</td><td></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td>संमतीपत्र देणे किंवा नाकारणे</td><td>लाल प्रवर्ग</td><td>नारंगी प्रवर्ग</td><td>हरित प्रवर्ग</td></tr>
<tr><td>१</td><td>उद्योग स्थापना करण्यासाठी</td><td>६०</td><td>४५</td><td>३०</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रथम कार्यान्वयासाठी</td><td>९०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
<tr><td>३</td><td>संमती पत्राचे नूतनीकरण किंवा विस्तार किंवा सुधारणा</td><td>१२०</td><td>६०</td><td>३०</td></tr>
</table>
</td><td>प्रादेशिक अधिकारी</td><td>विभाग प्रमुख</td><td>सदस्य सचिव</td></tr>
<tr><td>(ग)</td><td>५१ – १०० खाटा</td><td>विभाग प्रमुख</td><td>सदस्य सचिव</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>(घ)</td><td>१०१ – २०० खाटा</td><td>संमतीपत्र समिती</td><td>अध्यक्ष</td><td>प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग</td></tr>
<tr><td>(ड)</td><td>२०१ व त्यापेक्षा अधिक खाटा</td><td>संमतीपत्र मुल्यांकन समिती</td><td>प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग</td><td>--</td></tr>
</table>

मात्र EoDB कार्यक्रमातंर्गत, मंडळाने हिरवा, नारिंगी व लाल श्रेणींसाठी संमती मंजूर/ नामंजूर करण्याचा सेवा वितरण कालावधी अनुक्रमे १५ दिवस, २४ दिवस व ४० दिवस असा स्वयंप्रेरित पद्धतीने सुधारित केला आहे.

टिप : संगणकीय प्रणाली मार्फत (https://www.ecmpcb.in)
आपले सरकार (https://aaplesarkar.mahaonline.gov.in)
मैत्री कक्ष (https://maitri.maharashtra.gov.in) येथे अर्ज करु शकता.

# परिशिष्ट एक (अ)

उद्योग उभारणीसाठी व उद्योग सुरु करण्यासाठी संमतीपत्राकरिता द्यावयाच्या शुल्काचा तक्ता (२५.०८.२०११ पासून)

| उद्योगाची गुंतवणूक | उद्योग उभारणीसाठी रुपये | उद्योग सुरु करण्यासाठी रुपये |
|---|---|---|
| रु. १०० कोटीपेक्षा जास्त | भांडवली गुंतवणुकीच्या ०.०२% | भांडवली गुंतवणुकीच्या ०.०२% |
| रु. ७५कोटीपेक्षा जास्त ते रु. १०० कोटी पर्यंत | १,२५,०००/- | १,२५,०००/- |
| रु. ५० कोटीपेक्षा जास्त ते रु. ७५कोटीपर्यंत | १,००,०००/- | १,००,०००/- |
| रु. २५ कोटीपेक्षा जास्त ते रु. ५० कोटी पर्यंत | ७५,०००/- | ७५,०००/- |
| रु. १० कोटीपेक्षा जास्त ते रु. २५ कोटी पर्यंत | ५०,०००/- | ५०,०००/- |
| रु. ५ कोटीपेक्षा जास्त ते रु. १० कोटी पर्यंत | २५,०००/- | २५,०००/- |
| रु. १ कोटीपेक्षा जास्त ते रु. ५ कोटी पर्यंत | १५,०००/- | १५,०००/- |
| रु. ६० लाखापेक्षा जास्त ते रु. १ कोटी पर्यंत | ५,०००/- | ५,०००/- |
| रु. १० लाखापेक्षा जास्त ते रु. ६० लाखापर्यंत | १,५००/- | १,५००/- |
| रु. १० लाखापेक्षा कमी | ५००/- | ५००/- |
| टिप :- वर उल्लेखिलेले उद्योग सुरु करण्यासाठी लाल, नारंगी व हिरवा संवर्गासाठी उद्योगांसाठी शुल्क अनुक्रमे १, २, व ३ वर्षासाठी आकारण्यात येते. संमतीपत्र शुल्क पाच पटीत दिल्यानंतर संमतीपत्राचा कालावधी अनुक्रमे ५, १० व १५ वर्षासाठी राहील.<br>खाण प्रकल्पासाठी केलेल्या भांडवली गुंतवणुकीवर आकारण्यात येणाऱ्या संमतीशुल्काव्यतिरिक प्रतिवर्षी प्रति टन रु. ०.४० एवढे संमती शुल्क द्यावे लागेल. | | |

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण ) कायदा १९७४ अन्वये दोन वर्षासाठी संमतीपत्राचा कालावधी राहील व संमतीपत्राचे शुल्क खालीलप्रमाणे राहील:-

| | |
|---|---|
| महानगरपालिका | रु. १,००,०००/- |
| अ - वर्ग नगरपालिका | रु. ५०,०००/- |
| ब - वर्ग नगरपालिका | रु. ५,०००/- |
| क - वर्ग नगरपालिका | रु. २,०००/- |
| टिप :- संमतीपत्र शुल्क हे इपेमेन्ट गेटवेमार्फत ऑनलाईन अर्जासोबत स्वीकारले जाईल. | |

# परिशिष्ट एक (ब)

वैद्यकीय आस्थापना व सामाईक जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन केंद्र उभारणीसाठी व सुरु करण्यासाठी संमतीपत्राकरिता द्यावयाच्या शुल्काचा तक्ता (२१/०८/२०२४)

| क्रमांक | वैद्यकीय आस्थापना प्रकार / रुग्णशय्या संख्या | शुल्क (₹) | प्रति कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | शून्य रुग्णशय्या (*) | १०००/- | शून्य रुग्णशय्यासाठी एक कार्यकाळ = ३ वर्षे |
| २ | १ - १० रुग्णशय्या | २०००/- | प्रति कार्यकाळ = ३ वर्षे |
| ३ | ११ - ५० रुग्णशय्या | ५०००/- | प्रति कार्यकाळ = ३ वर्षे |
| ४ | ५१ - १०० रुग्णशय्या | १५०००/- | प्रति कार्यकाळ = २ वर्षे |
| ५ | १०१ - ३०० रुग्णशय्या | ५००००/- | प्रति कार्यकाळ = २ वर्षे |
| ६ | ३०१ - ५०० रुग्णशय्या | १०००००/- | प्रति कार्यकाळ = २ वर्षे |
| ७ | ५०१ - १००० रुग्णशय्या | २०००००/- | प्रति कार्यकाळ = १ वर्षे |
| ८ | १००० पेक्षा जास्त रुग्णशय्या | ५०००००/- | प्रति कार्यकाळ = १ वर्षे |
| ९ | पॅथॉलॉजिकल प्रयोगशाळा, रक्तपेढी, डायग्नोस्टिक सेंटर | ५०००/- | प्रति कार्यकाळ = १ वर्षे |
| १० | जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन केंद्र | १०००००/- | प्रति कार्यकाळ = १ वर्षे |

टिप : संशोधन व विकास कामे (R & D activities) आणि जे उद्योग जैव वैद्यकीय कचरा निर्माण करतात, त्यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या भांडवली गुंतवणुकीच्या आधारावर सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीयकचराव्यवस्थापनप्राधिकरपत्र प्राप्त करावे.

* शून्य रुग्णशय्या आरोग्य सेवा आस्थापने, उदा. ॲलोपॅथीक क्लिनिक्स आणि डिस्पेन्सरी, आयुर्वेदिक क्लनिक्स आणि डिस्पेन्सरी, युनानी आणि होमिओपथिक क्लिनिक्स आणि डिस्पेन्सरी, पॉलीक्लिनिक्स आणि डिस्पेन्सरी, ॲक्युपंक्चर आणि फिजिओथेरपी केंद्र, दंत चिकित्सा, नेत्ररोग आणि त्वचा देखभाल क्लिनिक्स, पशुवैद्यकीय क्लिनिक, रक्तदान शिबिरे, नेत्र आणि आरोग्य तपासणी शिबिरे, नमुना संकलन केंद्र.

राज्य आणि केंद्रीय सरकारी आरोग्य सेवा आस्थापनांसाठी रुग्णशय्येच्या वर्गीकरणावर आधारित संमतीपत्र नि:शुल्क दराने लागू होईल.

राज्य आणि केंद्रीय सरकारी आरोग्य सेवा आस्थापने, उदा. सार्वजनिक आरोग्य विभागाचे रुग्णालय, बाल आणि प्रसूती, आयुर्वेदिक आणि आयुष विभाग, राज्य आणि केंद्रीय सरकारचे पशुवैद्यकीय रुग्णालय, कर्मचारी राज्य विमा महामंडळ, मानसिक आरोग्य संस्था, संरक्षण विभाग, गृह विभागाचे रुग्णालये आणि फॉरेंसिक लॅबोरेटरी, अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या संशोधन आणि विकास क्रिया, भारतीय रेल्वे, रक्तपेढी, सार्वजनिक आारोग्य प्रयोगशाळा, सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालये, इत्यादी.

# परिशिष्ट एक (क)
## अधिकाराचे प्रदान

संमतीपत्र जलद निकाली काढण्यासाठी, मंडळातील अधिकाऱ्यांना सदस्य सचिवांना व संमतीपत्र सत्यापन समितीस प्रदान करण्यास आलेले अधिकार पुढील प्रमाणे आहेत (गुंतवणुकीवर आधारित)

| अ. क्र | प्राधिकरी/ समिती | लाल संवर्गातील उद्योग | नारंगी संवर्गातील उद्योग | हिरव्या संवर्गातील उद्योग | स्थानिक प्राधिकरण/ कटक मंडळे व इतर योजना प्राधिकरण | नगर वसाहत, माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक विभाग, महामार्ग, जलसिंचन प्रकल्प इमारती व बांधकाम प्रकल्प |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उप प्रादेशिक अधिकारी | -- | -- | रु. १०० कोटी पर्यंत | क वर्ग नगरपालिका व नगरपंचायत | -- |
| २ | प्रादेशिक अधिकारी | परिशिष्ट अ मधील उद्योग वगळून रु.१० कोटी पर्यंत | रु. १५० कोटी पर्यंत | रु. १०० ते रु. ५०० कोटीपर्यंत | ब वर्ग नगरपालिका व कटकमंडळे | रु. २५ कोटी पर्यंत |
| ३ | विभाग प्रमुख (तांत्रिक) | रु. १० कोटीहून अधिक ते रु.५० कोटी पर्यंत | रु. १५० कोटीहून अधिक ते रु. ५०० कोटीपर्यंत | रु. ५०० कोटी ते रु. १००० कोटीपर्यंत | अ वर्ग नगरपालिका व कटकमंडळे | रु. २५ कोटी ते रु. १०० कोटीपर्यंत |
| ४ | संमतीपत्र समिती (सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली) | रु. ५० कोटीहून अधिक ते रु. १५० कोटीपर्यंत | रु. ५०० कोटीहून अधिक ते रु. १५०० कोटीपर्यंत | रु. १००० कोटीहून अधिका ते रु. ४००० कोटीपर्यंत | सर्व महानगरपालिका | रु. २५कोटीहून` अधिक ते रु. ७५० कोटीपर्यंत |
| ५ | संमतीपत्र मूल्यांकन समिती | रु. १५० कोटीहून अधिक | रु. १५०० कोटीहून अधिक | रु. ४००० कोटीहून अधिक | ---- | रु. ७५० कोटीहून अधिक |

# परिशिष्ट दोन

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल कायद्यांतर्गत संमतीपत्र नामंजूर केल्यास अपील व पुर्निरीक्षण अपील करण्याची तरतूद

| अ. क्र | तपशील | काम पूर्ण होण्याचा कालावधी | संपर्क अधिकारी व त्याचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र नाकारल्यानंतर प्रवर्तकास शासनाकडे अपील करता येते | संमतीपत्र नामंजूर करण्याचे पत्र मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत अपील दाखल करता येते. जर संयुक्तिक कारण असेल तर प्रकल्प प्रवर्तकास शासनाकडे पुढील १५ दिवसात, उशिराबाबत कारण देऊन, अपिलीय प्राधिकरणाच्या संमतीने अपील दाखल करता येईल. | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मुंबई महानगरपालिका शासनाने नियुक्त केले आहेत. | |
| २ | शासनाकडे अपीलावर सुनावणी देण्यात येते | अपील मिळाल्यापासून ३ महिन्याचे आत. | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई. | |
| ३ | अपिलावर निर्णय प्रकल्प प्रवर्तकास अमान्य असल्यास मा. मंत्री (पर्यावरण) याच्याकडे पुनर्निरीक्षण अपील सादर करता येते | अपिलावर निर्णयाचे पत्र मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई. | |
| ४ | मा.मंत्री (पर्यावरण) यांच्याकडे पुनर्निरीक्षण अर्जावर सुनावणी ठेवण्यात येते | पुनर्निरीक्षण अपील मिळाल्यापासून ३० महिन्याच्या आत | मा. मंत्री (पर्यावरण), मंत्रालय, मुबई. | |
| ५ | सुनावणीनंतर प्रकल्प प्रवर्तकाकडे निर्णय कळविण्याचा कालावधी | सुनावणीच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई. | |

# परिशिष्ट तीन

जनतेच्या प्रदूषण विषयक तक्रारीबाबत कार्यवाही

| अ.क्र. | तक्रारीचे स्वरूप | संपर्क अधिकारी व त्याचे कार्यालय | तक्रार निवारणासाठी आवश्यक कालावधी |
|---|---|---|---|
| १. | कारखान्यातील जल प्रदूषण / हवा प्रदूषण व घनकचऱ्याचे प्रदूषण वा ध्वनि प्रदूषण | संबंधित कारखान्यातील व्यवस्थापक किंवा मालक. | १५ दिवस |
| २. | कारखान्यातील जल प्रदूषण /हवा प्रदूषण व घनकचऱ्याचे प्रदूषण वा ध्वनि प्रदूषण. | उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी कार्यालय. | ३० दिवस |
| ३. | वरील तक्रार निवारण न झाल्यास | प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक अधिकारी कार्यालय. | पुढील ३० दिवस |
| ४. | वरील तक्रार निवारण न झाल्यास | विधी अधिकारी, मुख्य कार्यालय | पुढील ३० दिवस |
| ५. | वाहन प्रदूषणाबाबत तक्रारी. | संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी | - |
| ६. | नागरी भागातील वस्तीमधील हवा, जल, ध्वनी, घनकचरा प्रदूषणाबाबत. | मुख्य अधिकारी, नगरपालिका/ तहसीलदार/ महानगरपालिका आयुक्त यांचे कार्यालय. | - |
| ७. | ग्रामीण भागातील वस्तीमधील हवा, जल, ध्वनी, घनकचरा प्रदूषणाबाबत. | ग्रामसेवक / तलाठी / तहसीलदार | - |
| ८. | वाहनातून वायु गळती / द्रव पदार्थ गळती झाल्यास. | पोलिस इन्सपेक्टर /अग्निशमन अधिकारी / महसूल अधिकारी. | |

टिपण्णी. - वरील १ ते ४ मधील तक्रार तातडीच्या स्वरूपाची उदा. कारखान्यातून विषारी वायु गळती, उग्र दर्प इ. असेल तर वरील कालावधी बाध्य राहणार नाही. या संदर्भात उचित कार्यवाही तात्काळ करावयाची आहे.

टिप. - विहित कालावधित काम पूर्ण न झाल्यास संबंधितांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी.

# परिशिष्ट चार

**घातक द्रव्य गळतीच्या वेळी घ्यावयाची सर्वसाधारण काळजी**

१) घातक द्रव्य गळतीबाबत तातडीने जिल्हाधिकारी, पोलीस, अग्निशमन दलास दळवावे.

२) जर लोकवस्ती असलेल्या ठिकाणी वायू जाऊ लागला, तर तेथील रहिवाश्यांना इशारा द्यावा.

३) ३. जर द्रव्य / वायु / धुर, नदी - नाल्यात वाहत्या पाण्यात किंवा शेतात मिसळले, तर पोलीस / अग्निशमन दल / नदीच्या खालच्या बाजूच्या पाणीपुरवठा केंद्रांना सूचना द्याव्यात व पुढची खबरदारी घेण्याविषयी कळवावे.

४) गळती होत असेल, अशावेळी वाहने रस्त्याच्या बाजूला व गर्दीच्या परिसरापासून व लोकवस्थीपासून दूर उभी करावीत.

५) गळतीच्या वेळी वाऱ्याच्या उलट दिशेला वाहने उभी करावीत.

६) गळती होत असलेल्या ठिकाणांची नाकेबंदी करावी.

७) गळती बंद करताना सुरक्षा उपकरणे वापरावीत.

८) कपडे काढून अपाय झालेला भाग भरपूर पाण्याने धुवून काढावा व त्याचबरोबर ओले कपडे घालू नयेत.

९) पापण्या उघड्या ठेऊन जळजळ थांबेपर्यंत भरपूर पाण्याने धुवावेत.

१०) अपाय झालेल्यांना मोकळया व ताज्या हवेत न्यावे. त्याला पाठीवर झोपवावे व आवश्यकता भासल्यास प्राणवायु द्यावा.

११) मोठ्या प्रमाणावर द्रवांच्या वाफेमध्ये / वायुमध्ये श्वसन टाळावे.

१२) जर पाणी मिळाले नाही, तर गळती झालेल्या जमिनीवर माती किंवा वाळू पसरवावी.

१३) गरज पडली तर रिकामी टँकर मागवावा, जेणेकरून घातक रसायन भरता येईल.

**पर्यावरण विषयक जनजागृती**

१) पर्यावरण पूरक सण / उत्सव साजरे करण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे.

२) प्रदूषण नियंत्रणासाठी वेळोवेळी दूरदूर्शनवर जाहिरात दिली जाते.

३) प्रदूषण नियंत्रणासाठी जाहिराती फलक, भित्तीपत्रके, महत्त्वाच्या ठिकाणी लावण्याबाबत उद्योजकांना सूचना देण्यात येतात.

४) पर्यावरण जनजागृतीबाबत कार्यक्रम आयोजित केले जातात.

५) मोठे उद्योग उभारण्यापूर्वी लोकसुनावणी घेण्यात येते.

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अंमलबजावणी करीत असलेले अधिनियम व नियम

१) जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व सुधारीत अधिनियम, २०२४

२) हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ व सुधारीत अधिनियम, २०२४

३) महाराष्ट्र जल(प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) नियम, १९८३

४) महाराष्ट्र हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) नियम, १९८३

५) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५

६) महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६

७) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६. सदरहू अधिनियमातर्गत खालील नियमांची व सुधारीत नियमांची अंमलबजावणी करण्यात येते

- पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ व सुधारीत पर्यावरण (संरक्षण) नियम, २०१६
- घातक व इतर कचरा ( व्यवस्थापन व सीमांतर्गत वाहतूक) नियम, २०१६
- जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६
- घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६
- बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम, २०१६.
- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६
- ई-कचरा (व्यवस्थापन) नियम, २०१६
- धोकादायक रासायन, उत्पादन, साठवणूक आणि आयात नियम, १९८९
- ध्वनी प्रदूषण (विनियमन व प्रतिबंध) नियम, २०००
- बॅटरी (व्यवस्थापन व हाताळणी) नियम,२००१
- आर्द्र जमीन (संवर्धन व व्यवस्थापन) नियम, २०१०

### अधिसूचना

१. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६

२. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण अधिनियम, २०१०

३. सागरतटीय विनियमन परिमंडल अधिसूचना, २०११

४. महाराष्ट्र प्लास्टीक व थर्मोकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक), अधिसूचना, २०१८.

५. पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रांबाबत भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने जारी केलेल्या विविध अधिसूचना खालीलप्रमाणे :

- डहाणू अधिसूचना
- मुरुड जंजिरा अधिसूचना
- महाबळेश्वर-पांचगणी अधिसूचना
- माथेरान अधिसूचना
- अँटॉप हिल अधिसूचना
- पश्चिम घाट अधिसूचना

# पर्यावरण कायद्यातील खालील कलमांनुसार कसुरदाराविरुद्ध करण्यात येणारी कायदेशीर कारवाई

**अ. जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व २०२४ च्या सुधारणेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास खालीलप्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार आहेत.**

१) **कलम २७**: सदर कलमानुसार मप्रनि मंडळास, कारखान्यांनी जर संमत्तीपत्रतील अटीं व शर्तींची पूर्तता केली नसल्यास, सदर कारखान्याचे संतती पत्र रद्द / नाकारण्याचे अधिकार आहेत.

२) **कलम २८ :** राज्य मंडळाने कलम २५, कलम २६ किंवा कलम २७ अन्वये काढलेल्या आदेशामुळे बाधित झालेली कोणतीही व्यक्ति, तो आदेश तिला कळविण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाने गठीत केलेल्या अपिल प्राधिकरणाकडे अपिल दाखल करु शकेल.

३) **कलम ३२:** सदर कलमानुसार मप्रनि मंडळास, नाले व विहिरी व जमिनी, विषारी किंवा प्रदूषित बाबींमुळे प्रदूषित होत असतील तर, अश्यांवर प्रतिबंधात्मक आदेश देण्याचे अधिकार आहेत.

४) **कलम ३३:** सदरहू कलमानुसार मप्रनि मंडळास, नाले व विहिरी यांचे पाणी प्रदूषित होण्याची संभावना असेल तर, संबंधित न्यायालयात अर्ज दाखल करण्याचे अधिकार आहेत.

५) **कलम ३३ अ :** मप्रनि मंडळास कासूरदारांना कोणतेही तसेच प्रस्तावित/ बंदचे आदेश देण्याचे अधिकार आहेत. सदर आदेशान्वये मप्रनि मंडळ कासूरदारांचा वीज, पाणी व इतर सुविधा खंडित करू शकते.

६) **कलम ४१:** सदर कलमानुसार, कलम २० च्या पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) मधील निर्देशांमध्ये विर्निदिष्ट केलेल्या अशा कालावधीत पालन करण्यास कसूर करेल तो कसूरदार अपराध सिध्दीनंतर, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल अशा कारावासाची किंवा रु.१०,०००/- असेल अशा दंडास पात्र असेल.

७) **कलम ४३:** सदर कलमानुसार, कलम २४ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास, कसुरदार रु.१०,०००/- पेक्षा कमी नसेल परंतु रु.१० लाखापर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल. तसेच सदर तरतुदींचे उल्लंघन वारंवार होत असल्यास कसुरदार प्रतिदिन रु.१०,०००/- अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

८) **कलम ४४:** सदर कलमानुसार, कलम २५ किंवा २६ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास, कसुरदार रु.१०,०००/- पेक्षा कमी नसेल परंतु रु.१५ लाखापर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल.

९) **४५ अ :** सदर कलमांनुसार जो कोणी या अधिनियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करेल किंवा ज्यासाठी या अधिनियमात अन्यत्र शिक्षेची तरतुद करण्यात आलेली नसेल, असा कसुरदार रु.१०,०००/-

पेक्षा कमी नसेल परंतु रु.१५ लाखापर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल. तसेच सदर तरतुदींचे उल्लंघन वारंवार होत असल्यास कसुरदार प्रतिदिन रु.१०,०००/- अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

१०) **४५ ब** : (१) या कायद्याच्या तरतुदींनुसार दंड निश्चित करण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकारच्या संयुक्त सचिव किंवा राज्य सरकारच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करेल, जेणेकरून चौकशी केली जाईल आणि विहित पद्धतीने दंड आकारला जाईल: परंतु केंद्र सरकार आवश्यक तितके अधिकाधिक निर्णय अधिकारी नियुक्त करू शकेल. (२) निर्णय अधिकारी प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितींशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला साक्ष देण्यासाठी किंवा कोणताही दस्तऐवज सादर करण्यासाठी बोलावू शकतो आणि हजर राहण्यास भाग पाडू शकतो, जो निर्णय अधिकाऱ्याच्या मते, चौकशीच्या विषयासाठी उपयुक्त किंवा संबंधित असू शकतो आणि जर अशा चौकशीवर, त्याला खात्री झाली की संबंधित व्यक्तीने या कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे, तर तो या कायद्याच्या तरतुदींनुसार योग्य वाटेल असा दंड ठरवू शकतो: परंतु संबंधित व्यक्तीला प्रकरणात बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय असा कोणताही दंड आकारला जाणार नाही. (३) कलम ४१, ४१अ, ४२, ४३, ४४, ४५अ आणि ४८ च्या तरतुदींनुसार आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा, २०१० च्या कलम १५ सह कलम १७ अंतर्गत सवलत किंवा भरपाई देण्याच्या दायित्वाव्यतिरिक्त असेल.

११) **४५ क :** कलम ४५ब अंतर्गत निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा, २०१० च्या कलम ३ अंतर्गत स्थापन केलेल्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे अपील करू शकते.

१२) **४५ इ (१) :** कलम २५ किंवा कलम २६ च्या तरतुदींचे पालन करण्यास जो कोणी कसूर करेल, अशा कसुरदारास १ वर्ष आणि ६ महिन्यांपेक्षा कमी नसलेली परंतु ६ वर्षांपर्यंत वाढवता येऊ शकेल अशा कारावासाची आणि दंडाची शिक्षा होईल, आणि वारंवार उल्लंघन होत असल्यास, पहिल्या अशा उल्लंघनासाठी दोषी ठरवल्यानंतर ज्या काळात असे उल्लंघन चालू राहील त्या प्रतिदिवसाला रु.५०,०००/- पर्यंत वाढू शकेल असा अतिरिक्त दंड आकारला जाईल.

## आ. हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ व २०२४ च्या सुधारणेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास खालीलप्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार आहेत.

१) **कलम ३७ :** सदर कलमानुसार, जो कोणी, कलम २१ किंवा कलम २२ च्या तरतुदींचे किंवा कलम ३१अ अन्वये काढलेल्या निर्देशांचे अनुपालन करण्यात कसूर करील, असा कसुरदार रु.१०,०००/- पेक्षा कमी नसेल परंतु रु.१५ लाखापर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल. तसेच सदर तरतुदींचे उल्लंघन वारंवार होत असल्यास कसुरदार प्रतिदिन रु.१०,०००/- अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

२) **कलम ३९ :** सदर कलमानुसार जो कोणी या अधिनियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करेल किंवा ज्यासाठी या अधिनियमात अन्यत्र शिक्षेची तरतुद करण्यात आलेली नसेल, असा कसुरदार रु.१०,०००/- पेक्षा कमी नसेल परंतु रु.१५ लाखापर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल. तसेच सदर तरतुदींचे उल्लंघन वारंवार होत असल्यास कसुरदार प्रतिदिन रु.१०,०००/- अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

३) **कलम ३९ अ :** (१) या कायद्याच्या तरतुदींनुसार दंड निश्चित करण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकारच्या संयुक्त सचिव किंवा राज्य सरकारच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करेल, जेणेकरून चौकशी केली जाईल आणि विहित पद्धतीने दंड आकारला जाईल. परंतु केंद्र सरकार आवश्यक तितके अधिकाधिक निर्णय अधिकारी नियुक्त करू शकेल. (२) निर्णय अधिकारी प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितींशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला साक्ष देण्यासाठी किंवा कोणताही दस्तऐवज सादर करण्यासाठी बोलावू शकतो आणि हजर राहण्यास भाग पाडू शकतो, जो निर्णय अधिकाऱ्याच्या मते, चौकशीच्या विषयासाठी उपयुक्त किंवा संबंधित असू शकतो आणि जर अशा चौकशीवर, त्याला खात्री झाली की संबंधित व्यक्तीने या कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे, तर तो या कायद्याच्या तरतुदींनुसार योग्य वाटेल असा दंड ठरवू शकतो: परंतु संबंधित व्यक्तीला प्रकरणात बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय असा कोणताही दंड आकारला जाणार नाही. (३) कलम ३७, ३८, ३८अ किंवा ३९ च्या तरतुदींनुसार आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा, २०१० च्या कलम १७ सह कलम १५ अंतर्गत सवलत किंवा भरपाई देण्याच्या दायित्वाव्यतिरिक्त असेल.

## इ. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ तसेच सुधारित अधिनियमांतर्गत असलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास.

१) **कलम ५:** सदरहू कलमानुसार मा. अध्यक्ष, मप्रनि मंडळ यांना कासूरदारांना प्रस्तावित/ बंदचे आदेश देण्याचे अधिकार आहेत. सदर आदेशान्वये मप्रनि मंडळ कासूरदारांचा वीज, पाणी व इतर सुविधा खंडित करू शकते.

२) **कलम १५:** सदर कलमानुसार जो कोणी या अधिनियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करेल किंवा ज्यासाठी या अधिनियमात अन्यत्र शिक्षेची तरतुद करण्यात आलेली नसेल, असा कसुरदार रु.१०,०००/- पेक्षा कमी नसेल परंतु रु.१५ लाखापर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल. तसेच सदर तरतुदींचे उल्लंघन वारंवार होत असल्यास कसुरदार प्रतिदिन रु.१०,०००/- अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

३) **कलम १५ (क) :** (१) या कायद्याच्या तरतुदींनुसार दंड निश्चित करण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकारच्या संयुक्त सचिव किंवा राज्य सरकारच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करेल, जेणेकरून चौकशी केली जाईल आणि विहित पद्धतीने दंड आकारला जाईल: परंतु केंद्र सरकार आवश्यक तितके अधिकाधिक निर्णय अधिकारी नियुक्त करू शकेल. (२) निर्णय अधिकारी प्रकरणातील तथ्ये आणि

परिस्थितींशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला साक्ष देण्यासाठी किंवा कोणताही दस्तऐवज सादर करण्यासाठी बोलावू शकतो आणि हजर राहण्यास भाग पाडू शकतो, जो निर्णय अधिकाऱ्याच्या मते, चौकशीच्या विषयासाठी उपयुक्त किंवा संबंधित असू शकतो आणि जर अशा चौकशीवर, त्याला खात्री झाली की संबंधित व्यक्तीने या कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे, तर तो या कायद्याच्या तरतुदींनुसार योग्य वाटेल असा दंड ठरवू शकतो: परंतु संबंधित व्यक्तीला प्रकरणात बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय असा कोणताही दंड आकारला जाणार नाही. (३) कलम ४१, ४१अ, ४२, ४३, ४४, ४५अ आणि ४८ च्या तरतुदींनुसार आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा, २०१० च्या कलम १७ सह कलम १५ अंतर्गत सवलत किंवा भरपाई देण्याच्या दायित्वाव्यतिरिक्त असेल.

प्रदूषण नियंत्रण मंडळाना वरील कायद्यांतर्गत कसुरदारांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे पुरेसे अधिकार प्राप्त आहेत. तरी पर्यावरण कायद्यांचे उल्लंघन केल्यास कसुरदाराविरुध्द सदरहू अधिनियमांतर्गत वरीलप्रमाणे योग्य ती कायदेशीर कारवाई मंडळास करता येते.

# मुख्यालयातील विभागप्रमुख

| विभाग | विभागप्रमुख (पदनाम) | ई-मेल |
|---|---|---|
| १ | २ | ४ |
| तांत्रिक विभाग | जल प्रदूषण निवारण अभियंता | jdwater@mpcb.gov.in |
| तांत्रिक विभाग | हवा प्रदूषण निवारण अभियंता | jdair@mpcb.gov.in |
| वैज्ञानिक विभाग | प्रधान वैज्ञानिक अधिकारी | pso@mpcb.gov.in |
| तांत्रिक विभाग | सहायक सचिव (तांत्रिक) | ast@mpcb.gov.in |
| तांत्रिक विभाग | प्रादेशिक अधिकारी (जैव वैद्यकीय कचरा) | robmw@mpcb.gov.in |
| तांत्रिक विभाग | प्रादेशिक अधिकारी,मुख्यालय | rohq@mpcb.gov.in |
| लेखाशाखा | मुख्य लेखा अधिकारी - १ | cao@mpcb.gov.in |
| | मुख्य लेखा अधिकारी - २ | cao2@mpcb.gov.in |
| कार्यकारी अभियंता विभाग | कार्यकारी अभियंता | ee@mpcb.gov.in |
| विधी व योजना विभाग -१ | विधी अधिकारी | lo@mpcb.gov.in |
| विधी व योजना विभाग २ | विधी अधिकारी | lo1@mpcb.gov.in |
| आस्थापना विभाग | प्रशासकीय अधिकारी | aoeb@mpcb.gov.in |
| सहायक सचिव (आस्थापना) विभाग | सहायक सचिव (आस्थापना) | ase@mpcb.gov.in |
| सांख्यिकी विभाग | सांख्यिकी अधिकारी | so@mpcb.gov.in |
| पर्यावरण माहिती केंद्र विभाग | सहायक सचिव (तांत्रिक) / सांख्यिकी अधिकारी | ast@mpcb.gov.in |

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयांची विभागनिहाय तपशीलवार माहिती

| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयांची विभागनिहाय तपशीलवार माहिती | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | **कार्यालयाचे नाव व पत्ता** | **कार्यालयांतर्गत येणारे कार्यक्षेत्र** | **ई-मेल आयडी** |
| | | | |
| १ | प्रादेशिक कार्यालय, मुंबई<br>कल्पतरु पॉईट, दुसरा मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव माटुंगा स्कीम रोड, क्र. ८, शीव सर्कल समोर, शीव (पुर्व) मुंबई- ४०० ०२२. | मुंबई महानगरपालिका विभाग | romumbai@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१<br>कल्पतरु पॉईट, दुसरा मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव माटुंगा स्कीम रोड, क्र. ८, शीव सर्कल समोर, शीव (पुर्व) मुंबई- ४०० ०२२. | मुंबई बेट, विभाग क्रमांक अ,ब,क, ड व फ (दक्षिण) फ (उत्तर) जी (दक्षिण) आणि जी (उत्तर) | sromumbai1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-२<br>कल्पतरु पॉईट, दुसरा मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव माटुंगा स्कीम रोड, क्र. ८, शीव सर्कल समोर, शीव (पुर्व) मुंबई- ४०० ०२२. | मुंबई उपनगर विभाग<br>एम/एच (पश्चिम), एम/एच (पूर्व) आणि एल | sromumbai2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-३<br>कल्पतरु पॉईट, दुसरा मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव माटुंगा स्कीम रोड, क्र. ८, शीव सर्कल समोर, शीव (पुर्व) मुंबई- ४०० ०२२. | मुंबई उपनगर विभाग<br>के (पूर्व), के (पश्चिम) एस,एन, आणि पी (दक्षिण) | sromumbai3@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-४<br>कल्पतरु पॉईट, दुसरा मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव माटुंगा स्कीम रोड, क्र. ८, शीव सर्कल समोर, शीव (पुर्व) मुंबई- ४०० ०२२. | मुंबई उपनगर विभाग<br>पी (उत्तर), आर (उत्तर) आर (दक्षिण) आणि ट विभाग | sromumbai4@mpcb.gov.in |
| २ | प्रादेशिक कार्यालय, ठाणे<br>प्लॉट नं. पी-३०, ५ वा मजला,<br>ऑफिस कॉम्पलेक्स बिल्डिंग, मुलुंड चेकनाका,<br>ठाणे - ४०० ६०४ | ठाणे जिल्हा. | rothane@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| | उप प्रादेशिक अधिकारी, ठाणे - १<br>प्लॉट नं. पी-३०, ५ वा मजला,<br>ऑफिस कॉम्पलेक्स बिल्डिंग, मुलुंड चेकनाका,<br>ठाणे - ४०० ६०४ | ठाणे महानगरपालिका,वागळे इस्टेट एम.आय.डी.सी. | srothane1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक अधिकारी, ठाणे - २<br>प्लॉट नं. पी-३०, ५ वा मजला,<br>ऑफिस कॉम्पलेक्स बिल्डिंग, मुलुंड चेकनाका,<br>ठाणे - ४०० ६०४ | ठाणे तालुका, ठाणे महानगरपालिका विभाग, मीरा भाईंदर आणि वसई विरार महानगरपालिका आणि पालघर जिल्हयातील वसई तालुका | srothane2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक अधिकारी,तारापूर - १<br>एम.आय.डी.सी. ऑफिस बिल्डिंग,<br>बोईसर स्टेशन, पोस्ट टॅप्स (TAPS),<br>तारापूर, जि.ठाणे- ४०१ ५०६ | तारापूर एम. आय. डी. सी. आणि संबंधीत विभाग | srotarapur1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक अधिकारी,तारापूर - २<br>एम.आय.डी.सी. ऑफिस बिल्डिंग,<br>बोईसर स्टेशन, पोस्ट टॅप्स (TAPS),<br>तारापूर, जि.ठाणे- ४०१ ५०६ | डहाणू, तलासारी, मोखाडा, जव्हार, विक्रमगड आणि पालघर तालुक्यातील (उप प्रा.का. १ कार्यकक्षा वगळता) | srotarapur2@mpcb.gov.in |
| ३ | प्रादेशिक कार्यालय, कल्याण<br>सिध्दीविनायक संकुल, ३ रा मजला, ओक बाग, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) ४२१ ३०१ | कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर, वाडा मुरबाड आणि ठाणे जिल्ह्याचा शहापूर तालुका | rokalyan@mpcb.gov.in, |
| | उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण - १<br>सिध्दीविनायक संकुल, ३ रा मजला, ओक बाग, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) ४२१ ३०१ | कल्याण भिवंडी तालुका | srokalyan1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण - २<br>सिध्दीविनायक संकुल, ३ रा मजला मजला, ओक बाग, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) ४२१ ३०१ | उल्हासनगर, बदलापूर तालुका | srokalyan2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण - ३<br>सिध्दीविनायक संकुल, ३ रा मजला, ओक बाग, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) ४२१ ३०१ | वाडा तालुका (पालघर जिल्हा), मुरबाड, शहापूर तालुका (ठाणे जिल्हा) | srokalyan3@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| | उप प्रादेशिक कार्यालय, भिवंडी<br>सिध्दीविनायक संकुल, ४ था मजला, ओक बाग, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) ४२१ ३०१ | सारवली एम.आय.डी. सी. आणि भिवंडी तालुका (ठाणे जिल्हा), भिवंडी महानगरपालिका | srobhiwandi@mpcb.gov.in |
| ४ | प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई<br>रायगडभवन, ७ वा मजला, सेक्शन १, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ | ठाणे व रायगड जिल्हा व उप प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र | ronavimumbai@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई-१<br>रायगडभवन, ७ वा मजला, सेक्शन १, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ | सीबीडी बेलापूर, शिरवणे, नेरुळ, सी-वूड, जुईनगर, तुर्भे, पवने, वाशी, खैरने (उप) | sronavimumbai1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई-२<br>रायगडभवन, ७ वा मजला, सेक्शन १, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ | ऐरोली, रबाळे,घणसोली, महापे, आणि एम.आय.डी.सी. खैरने (उप) दिघा, दहिसर मोरी पिंपरी उत्तरशीव घोटेघर | sronavimumbai2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, तळोजा<br>रायगडभवन, ७ वा मजला, सेक्शन १, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ | एम.आय.डी.सी. तळोजा, उरण तालुका | srotaloja@mpcb.gov.in |
| ५ | प्रादेशिक कार्यालय,रायगड<br>रायगडभवन, ६ वा मजला, सेक्शन ११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ | रायगड जिल्हा व उप प्रादेशिक कार्यालय, रायगड अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र | roraigad@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१<br>रायगडभवन, ६ वा मजला, सेक्शन ११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ | खालापूर व पनवेल तालुका (एमआयडीसी तळोजा वगळता) | sroraigad1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२<br>रायगडभवन, ६ वा मजला, सेक्शन ११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ | पेण, कर्जत, रोहा, अलिबाग, मुरुड जंजिरा तालुका | sroraigad2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, महाड<br>सामायिक सुविधा केंद्र बिल्डिंग, एम.आय.डी.सी. महाड, जि. रायगड ४०२ ३०९ | महाड, माणगाव, श्रीवर्धन, पोलादपूर आणि टाळा तालुका | sromahad@mpcb.gov.in |
| ६ | प्रादेशिक कार्यालय, पुणे<br>जोग सेंटर, तिसरा मजला, मुंबई -पुणे रोड, वाकडेवाडी, पूणे ४११ ००३ | पुणे जिल्हा | ropune@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| | उप प्रादेशिक कार्यालय,पूणे-१<br>जोग सेंटर, दुसरा मजला,<br>मुंबई -पुणे रोड, वाकडेवाडी, पूणे ४११ ००३ | हवेली (पुणे महानगरपालिका मर्यादीत) भोर, पुरंदर, बारामती, इंदापूर आणि दौंड कॉरपोरेशन-१ आणि कौन्सिल -६ | sropune1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय,पूणे-२<br>जोग सेंटर, दुसरा मजला,<br>मुंबई -पुणे रोड, वाकडेवाडी,<br>पूणे ४११ ००३ | हवेली तालुका (पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र वगळता.) पुणे जिल्ह्यातील खेड, मुळशी, आंबेगाव, जुन्नर, मावळ आणि शिरूर तालुका. | sropune2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय,पिंपरी-चिंचवड<br>जोग सेंटर, दुसरा मजला,<br>मुंबई -पुणे रोड, वाकडेवाडी, पूणे ४११ ००३ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभाग, एम.आय.डी.सी. पिंपरी, भोसरी आणि आकुर्डी. यासह) | sropimprichichwad@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय,सातारा<br>नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, एस.टी. स्टँडजवळ, सदर बाजार, सातारा, ४१५ ००१ | सातारा जिल्हा (११ तालुके ) सातारा, कऱ्हाड, फलटण,वाई, महाबळेश्वर, खंडाळा, मन, खटाव, पाटण, जावळी कोरेगाव, कॉन्सिल -०९ | srosatara@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय,सोलापूर<br>४/ब, बाली ब्लॉक, सिव्हील लाईन, शासकीय दुध डेअरीच्यासमोर, सातरस्ता, जि.सोलापूर ४१३ ००३ | सोलापूर जिल्हा | srosolapur@mpcb.gov.in |
| ७ | प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर<br>उद्योग भवन इमारत,<br>जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,<br>कोल्हापूर ४१६ ००२ | सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्हा | rokolhapur@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर<br>उद्योग भवन इमारत,<br>जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,<br>कोल्हापूर ४१६ ००२ | कोल्हापूर जिल्हा | srokolhapur@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| | उप प्रादेशिक कार्यालय, रत्नागिरी<br>महसुल विभाग, कर्मचारी को.ऑप. पतसंस्था लिमिटेड, कार्यालय इमारत, कलेक्टर ऑफिस कंपाऊंड, झाडगांव,  रत्नागिरी- ४१५ ६३९ | रत्नागिरी जिल्हा, राजापूर, रत्नागिरी, लांजा आणि संगमेश्वर तालुका<br>सिंधुदुर्ग जिल्हा, कुडाळ, कणकवली, सावंतवाडी, वेंर्गुला, मालवण, वैभववाडी, देवगड दोडामार्ग हे तालुके | sroratnagiri@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, चिपळूण,<br>परकार कॉम्पलेक्स, दुसरा मजला, २२४, चिपळूण नगरपरिषदेच्या मागे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, पिन कोड - ४१५ ६०५ | रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण, गुहागर, खेड, दापोली, मंडणगड तालुका | srochiplun@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, सांगली,<br>३००/२, उद्योगभवन, टाटा पेट्रोप पंपच्या पाठीमागे, शासकीय विश्रामगृहाच्या जवळ, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१६ | सांगली जिल्हा, मिरज, वालवा, शिराळा, आटपाटी, तासगाव, खानापूर, कडेगाव, पालुस, जत आणि कवठेमहाकाळ | srosangli@mpcb.gov.in |
| ८ | प्रादेशिक कार्यालय, नाशिक<br>उद्योगभवन, पहिला मजला, त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक ४२२ ००७ | नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्हा | ronasik@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, नाशिक<br>उद्योगभवन, पहिला मजला, त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक ४२२ ००७ | नाशिक जिल्हा | sronasik@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, जळगाव<br>हॉल नं. ए, तिसरा मजला, जुने बी. जे. मार्केट, जळगाव - ४२५ ००१ | जळगाव जिल्हा<br>जळगाव महानगरपालिका, भुसावळ, फैजपूर, सावडा, रावेर, पाचोरा, धरणगाव, चाळीसगाव, चोपडा, अमळनेर, भडगाव, जामनेर, यावल, वरणगाव | srojalgaon1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, धुळे<br>फुलचंद प्लाझा, दुसरा मजला,<br>बी. सी. कॉलेज रोड, एस.एस.व्ही. पी. एस. इंजिनिअरींग कॉलेज, विद्यानगरी जवळ, देवपूर,धुळे - ४२४ ००१ | धुळे जिल्हा<br>धुळे, शिरपूर, साक्री आणि सिंधखेडा, अवधान एम.आय.डी.सी. आणि नारदाना एम.आय.डी.सी. | srodhule@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नंदुरबार जिल्हा - नंदुरबार, नवापूर, शहादा, तळोदा, धाडगाव आणि अक्कलकुवा, नवापूर एम.आय.डी.सी. क्षेत्र | |
| | उप प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर<br>सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, पहिला मजला, हॉल नं. २ व ३, टी.व्ही. सेंटर, सावेडी, अहिल्यानगर ४१४ ००३ | अहमदनगर जिल्हा<br>अहमदनगर, नेवासा, श्रीरामपूर, संगमनेर, पारनेर, कोपरगाव हे एम.आय.डी.सी. क्षेत्र | sroahilyanagar@mpcb.gov.in |
| ९ | प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर<br>पर्यावरण भवन, प्लॉट नं. ए - ४/१, चिखलठाणा औद्योगिक वसाहत, सेट नंदलाल धुत हॉस्पिटलजवळ, छत्रपती संभाजीनगर ४३१ २१० | छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, धाराशीव | rochhatrapatisambhajinagar@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर<br>पर्यावरण भवन, प्लॉट नं. ए - ४/१, चिखलठाणा औद्योगिक वसाहत, सेट नंदलाल धुत हॉस्पिटलजवळ, छत्रपती संभाजीनगर ४३१ २१० | छत्रपती संभाजीनगर | srochhatrapatisambhajinagar1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, जालना,<br>प्लॉट नं. पी ३/१ आणि पी ३/२, हॉटेल आदर्श पॅलेसजवळ, जालना- छत्रपती संभाजीनगर रोड, एमआयडीसी वसाहत जालना | जालना व बीड<br>(बीडचा परळी तालुका वगळता) | srojalna@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय,लातूर<br>प्लॉट नं. पी-१०, लातूर जिल्हा उद्योग समूह इमारत, एम.आय.डी.सी. लातूर ४१३ ५३१ | लातूर, धाराशीव जिल्हा | srolatur@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय,परभणी<br>देवकृपा इमारत, रंगनाथ महाराज नगर, नंदखुला रोड, परभणी- ४३१ ४०१ | परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुका | sroparbhani@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय,नांदेड<br>लाहोटी कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शिवाजी महाराज पुतळयाजवळ, वजीराबाद, नांदेड - ४३१ ६०१ | नांदेड जिल्हा | sronanded@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | प्रादेशिक कार्यालय, नागपूर<br>उद्योगभवन, ५ वा मजला, विक्रीकर कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर ४४० ००१ | नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदीया जिल्हा | ronagpur@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर - १<br>उद्योगभवन, ५ वा मजला, विक्रीकर कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर ४४० ००१ | नागपूर शहर, कामठी, काटोल, कळमेश्वर, नरखेड, रामटेक, सावनेर, पारशिवणी | sronagpur1@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर - २<br>उद्योगभवन, ५ वा मजला, विक्रीकर कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर ४४० ००१ | नागपूर ग्रामीण तालुका हिंगणा, मौदा, नागपूर जिल्ह्यातील उमरेड, कुही भिवापूर आणि वर्धा तालुका | sronagpur2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, भंडारा,<br>तात्या टोपे वॉर्ड, सिटी पेट्रोल पंपाच्याजवळ, मिस्किन टँक, महाल रोड,भंडारा ४४१ ९०४ | भंडारा आणि गोंदीया जिल्हा | srobhandara@mpcb.gov.in |
| ११ | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर<br>उद्योगभवन, पहिला मजला, रेल्वे स्टेशनजवळ, चंद्रपूर ४४२ ४०१ | चंद्रपूर, गडचिरोली जिल्हा यवतमाळ जिल्हा | rochandrapur@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर<br>उद्योगभवन, पहिला मजला, रेल्वे स्टेशनजवळ, चंद्रपूर ४४२ ४०१ | चंद्रपूर जिल्हा, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्हा<br>चंद्रपूर एम.आय.डी.सी.<br>चंद्रपूर, तडाली, घुग्गुस, वरोरा<br>यवतमाळ एम.आय. डी.सी.<br>यवतमाळ, मुल, भद्रावती, चिमुर, गडचांदूर, नागभीड, गडचिरोली,कोटगळ,<br>कोळसा खाणी<br>चंद्रपूर, भद्रावती, बल्लारपूर, राजुरा आणि वरोरा पश्चिम कोळसा क्षेत्र | srochandrapur@mpcb.gov.in |
| १२ | प्रादेशिक कार्यालय, अमरावती<br>सहकार सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी, अमरावती ४४४ ६०६ | अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम | roamravati@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, अमरावती - १<br>सहकार सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी, अमरावती ४४४ ६०६ | अमरावती जिल्हा<br>अमरावती, अचलपूर, चांदूर बझार, तिवसा, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे मोर्शी, वरुड, | sroamravati1@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नांदगावखांदेश्वर, भातुकुली, धारणी, चिखलदरा | |
| | उप प्रादेशिक कार्यालय, अमरावती - २<br>सहकार सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी, अमरावती ४४४ ६०६ | वाशिम जिल्हा<br>वाशिम मंगरुळपीर, रिसोड, मानोरा, मालेगाव, कारंजा लाड | sroamravati2@mpcb.gov.in |
| | उप प्रादेशिक कार्यालय, अकोला,<br>हुतात्मा स्मारकासमोर, नेहरु पार्क चौक, आळशी प्लॉट, अकोला ४४४ ००१ | अकोला जिल्हा<br>अकोला, बाळापूर,पातूर, अकोट, मुर्तीजापूर, बार्शी टाकळी,<br>बुलढाणा, जिल्हा<br>बुलढाणा, चिखली ,मेहकर, लोणार, शेगाव, सिंदखेडराजा देऊळगावराजा, खामगाव, नांदुरा, मलकापूर, मोताळा | sroakola@mpcb.gov.in |

| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील मध्यवर्ती प्रयोगशाळा व प्रादेशिक प्रयोगशाळांबाबतची माहिती | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | **कार्यालयाचे नाव व पत्ता** | **कार्यालयांतर्गत येणारे कार्यक्षेत्र** | **ई-मेल आयडी** |
| १ | मध्यवर्ती प्रयोगशाळा,<br>निर्मलभवन, महापे<br>सी.बी.डी. बेलापूर | प्रादेशिक कार्यालय, मुंबई<br>(उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई -१/२/३/४)<br>प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई<br>(उप प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई- १/२/तळोजा)<br>प्रादेशिक कार्यालय, रायगड<br>(उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१/२)<br>प्रादेशिक कार्यालय, कल्याण<br>(उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण - १/२/३/भिवंडी) | clab@mpcb.gov.in |
| २ | प्रादेशिक प्रयोगशाळा, ठाणे<br>प्लॉट नं. पी-३०, ५ वा मजला, ऑफिस कॉम्पलेक्स बिल्डिंग, मुलुंड चेकनाका, ठाणे - ४०० ६०४ | प्रादेशिक कार्यालय, ठाणे<br>उप प्रादेशिक कार्यालय, ठाणे-१/२<br>उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-१/२ | sothanelab@mpcb.gov.in |
| ३ | प्रादेशिक प्रयोगशाळा, पुणे<br>जोग सेंटर, तिसरा मजला,<br>मुंबई -पुणे रोड, वाकडेवाडी,<br>पूणे ४११ ००३ | प्रादेशिक कार्यालय, पुणे<br>उप प्रादेशिक कार्यालय, पुणे १/२/ पिंपरी चिंचवड/सोलापूर/सातारा | sopunelab@mpcb.gov.in |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | प्रादेशिक प्रयोगशाळा, चिपळूण, परकार कॉम्पलेक्स, पहिला मजला, चिपळूण म्युनिसिपल कॉन्सिल ऑफिसच्या जवळ, जि. रत्नागिरी, चिपळूण ४१५ ६०५ | प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर<br>उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर/ रत्नागिरी/ सांगली/चिपळूण<br>उप प्रादेशिक कार्यालय, महाड | sochiplunlab@mpcb.gov.in |
| ५ | प्रादेशिक प्रयोगशाळा, नाशिक उद्योगभवन, पहिला मजला, त्र्यंबक रोड,सातपूर, नाशिक ४२२ ००७ | प्रादेशिक कार्यालय, नाशिक<br>उप प्रादेशिक कार्यालय,नाशिक/ जळगाव /धुळे/ अहमदनगर | sonashiklab@mpcb.gov.in |
| ६ | प्रादेशिक प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर<br>पर्यावरण भवन, प्लॉट नं. ए-४/१, चिखलठाणा औद्योगिक वसाहत, सेट नंदलाल धुत हॉस्पिटलजवळ, छत्रपती संभाजीनगर ४३१ २१० | प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर<br>उप प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर/लातूर/नांदेड/परभणी/ जालना | sochhatrapatisambhajinagarlab@mpcb.gov.in |
| ७ | प्रादेशिक प्रयोगशाळा, नागपूर उद्योगभवन, ५ वा मजला, विक्रीकर कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर ४४० ००१. | प्रादेशिक कार्यालय, नागपूर<br>उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर-१/२/भंडारा<br>उप प्रादेशिक कार्यालय, अमरावती-१/२/अकोला | sonagpurlab@mpcb.gov.in |
| ८ | प्रादेशिक प्रयोगशाळा, चंद्रपूर उद्योगभवन, पहिला मजला, रेल्वे स्टेशनजवळ, चंद्रपूर ४४२ ४०१ | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर<br>उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर | sochandrapurlab@mpcb.gov.in |

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय**
**कल्पतरु पॉईट, दुसरा/ तीसरा व चौथा मजला,**
**मूव्हीमॅक्स सिनेमा समोर, शीव माटुंगा स्कीम रोड, क्र. ८,**
**शीव सर्कल समोर, शीव (पुर्व) मुंबई- ४०० ०२२.**
**दूरध्वनी क्रमांक: ०२२-६७८०८८८८**




**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**

कल्पतरू पॉईंट, २रा, ३ रा व ४ था मजला, मूव्हीमॅक्स सिनेमा सामोर,
शीव सर्कल, शीव (पूर्व ), मुंबई- ४०००२२